MHAH230001652024

## नियमित दिवाणी दावा क्र. ६२/२०२४ मधील नि. ३९ वरील आदेश

## (सिंधूबाई शिवाजी पवार वि. दत्तु सहादू ढोरजकर व इतर)

**१.** वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम १७ नुसार वादपत्रात दुरुस्ती करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. वादीचे कथनानुसार, दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र.१ यांनी दावा कलम १–ब गट नं.१२७/१ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीपैकी वहिती ० हे. ६९ आर + खराबा ० हे. २० आर असे एकुण ० हे. ८९ आर एवढे क्षेत्र जाणिवपुर्वक वादी यांचा हिस्सा बुडविण्याच्या गैरहेतुने इसम नामे मोहन शिवाजी धावडे, रा.येळपणे, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर यांना बेकायदेशीरपणे विनाअधिकार पोकळीस्त खरेदीखत करून दिलेले आहे. सदर त्रयस्थ इसमास प्रतिवादीपणात समाविष्ट करणे गरजेचे आहे. तसेच परीणामी सरनाम्यामध्ये आवश्यक बदल करण्यासाठी, दावा कलम ३ मध्ये एक शब्दाची, दावा कलम ४ मध्ये १४७/१ ऐवजी १२७/१, दावा कलम ६ मध्ये संपुर्ण क्षेत्राऐवजी पैकी १ हे. २० आर ऐवढे क्षेत्र अशा दुरुस्त्या मागितल्या आहेत. तद्वतच दाव्यातील इतर परीच्छेदमध्ये अनुषंगिक दुरुस्ती, अर्जात नमुद केल्याप्रमाणे करणे आवश्यक आहे असे नमुद केले आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्यातील स्वरूपामध्ये कोणताही बदल होत नाही अथवा कोणतेही नविन कथन दाव्यात करण्यात येत नाही. सदर दुरुस्तीस परवानगी दिल्यास प्रतिवादींचे काहीएक नुकसान होणार नाही. सबब, प्रस्तुत अर्ज. अर्ज नि.३९ मध्ये दाव्यातील प्रस्तावित दुरुस्ती विशिष्टपणे नमुद आहेत.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केला. त्यांच्या कथनानुसार अर्ज खरा व बरोबर नाही. प्रतिवादी क्र.१ यांनी कायदेशीर गरजेकरीता मोहन शिवाजी धावडे यांना क्षेत्र विक्री केले आहे. प्रतिवादी क्र.१ हे अपंग आहेत. सदर व्यवहाराची कल्पना वादीला होती व आहे. असे असताना प्रतिवादीना त्रास देण्यासाठी प्रस्तूत अर्ज केला आहे. सदर दुरुस्ती झाल्यास दाव्याच्या स्वरूपात बदल होणार आहे. सबब अर्ज रद्द करण्यात यावा.

**३.** वादी व प्रतिवादी यांचे सुविदय वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

**४.** अर्ज व म्हणण्यातील कथनांवरुन पुढील वादप्रश्न उपस्थित होतात. सदर वादप्रश्न व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेह पुढीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जात विनंती केल्यानुसार वादपत्रात दुरुस्ती होवून मिळण्यास वादी हक्कदार आहेत काय ? | **...होकारार्थी** |
| २. | आदेश काय ? | **अर्ज मंजूर करण्यात येतो.** |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>वादप्रश्न क्र. १ व २ बाबत</u> –**

**५.** अभिलेख पडताळला. दावा बहिणीने भाऊ व इतर बहिणींच्या विरुध्द वाटणीकरीता दाखल केला आहे. दावा मिळकती वडिलोपार्जित आहेत असे वाद कथन आहे. दावा दाखल केल्यानंतर प्रतिवादी क्र.१ म्हणजेच वादीचा भाऊ याने काही वाद मिळकत मोहन शिवाजी धावडे यास दि.३०/०४/२०२४ रोजी नोंदणिकृत खरेदीखताने हस्तांतरीत केली. त्याबाबतच्या खरेदीखताची प्रत दाखल आहे. सदर व्यवहाराशी संबंधित दुरुस्ती करण्याची व सरनाम्यात खरेदीदार यास प्रतिवादी क्र.७ म्हणून समाविष्ट करण्याची परवानगी मागितली आहे. तसेच अर्जात विशिष्टरीत्या नमुद कलमांमध्ये अनुषंगिक संक्षिप्त दुरुस्त्या व इतर काही शब्दांमध्ये व क्षेत्राच्या गट क्रमांकामध्ये चुकीची दुरुस्ती करण्याकरीता परवानगी मागितली आहे. प्रस्तावित दुरुस्त्या पक्षकारांमधील सर्व वाद निर्णित करण्याच्या अनुषंगाने व दावा परीणामकारकरीत्या निकाली काढण्यासाठी अत्यावश्यक दिसुन येतात. याच मुद्यावर इतर प्रकरणे टाळण्याकरीता देखील प्रस्तावित दुरुस्ती मंजुर करणे न्याय्य ठरते. सदर दुरुस्ती झाल्यास दाव्याचे स्वरूप बदलणार नाही अथवा प्रतिवादींचे कुठलेही नुकसान होणार नाही. सबब वाद प्रश्न क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी देण्यात येत असून वादप्रश्न क्र. २ करीता, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

१. नि. ३९ येथील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. नि. ३९ येथील अर्जातील विनंतीनुसार वादीने पुढील तारखेस अगर तत्पुर्वी वादपत्रात दुरुस्ती करुन दुरुस्त वादपत्राची प्रत सादर करावी व त्याची दुरुस्त प्रत प्रतिवादींना पुरवावी.

SHIVAJI PANDHRINATH KEKAN

Digitally signed by SHIVAJI PANDHRINATH KEKAN
Date: 2025.02.28 17:24:29 +0530

श्रीगोंदा. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
दिनांक २८/०२/२०२५. श्रीगोंदा, जि. अहमदनगर.